## . ठाणे महानगरपालिका, ठाणे

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १९/०६/२०१४

### मा. सर्वसाधारण सभा इतिवृत्तांत
**सभा क्रमांक ०३ दिनांक १९/०६/२०१४**
**सभा सूचना क्रमांक ०२ दिनांक १०/०६/२०१४**
**सभा क्रमांक ०१ दिनांक १९/०६/२०१४**

ठाणे महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक १९/०६/२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता ठाणे महानगरपालिकेच्या " भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात "सभा सूचना क्रमांक ०२ दिनांक १०/०६/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्याकरिता आयोजित करण्यांत आली होती.

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर श्री. हरिश्चंद्र श्रीपत पाटील हे उपस्थित होते.
सदर सभेस उपस्थित सदस्य खालीलप्रमाणे .

**१) श्री. हरिश्चंद्र श्रीपत पाटील- महापौर**
**२) श्री. मुकेश मधुकर मोकाशी- उप महापौर**

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | नरेश रतन मणेरा | ४ | डुंबरे मनोहर जयसिंग |
| ५ | मिनाक्षी राजेंद्र शिंदे | ६ | उज्वला रामचंद्र फडतरे |
| ७ | स्नेहा अंकुश पाटील | ८ | पुर्णेकर जयनाथ यशवंत |
| ९ | भोईर संजय देवराम | १० | मधुकर रामचंद्र पावशे |
| ११ | चव्हाण तेजस्विनी किरण | १२ | आशादेवी शेरबहादूर सिंह |
| १३ | वाव्हळ सुभाष सिताराम | १४ | चव्हाण सुधाकर वामन |
| १५ | संभाजी धोंडिराम पंडीत | १६ | इंदिसे रेखाबाई मिनानाथ |
| १७ | सुशिला संकटाप्रसाद यादव | १८ | प्राजक्ता प्रदिप खाडे |
| १९ | राजकुमार रामनयन यादव | २० | राधा फत्तेबहादूर सिंह |
| २१ | सरैय्या अमित जयसिंग | २२ | चिंदरकर कांचन विजय |
| २३ | जगदाळे हनुमंत ज्ञानु | २४ | पाटील वर्षा वसंत |
| २५ | पालांडे दशरथ बाबुराव | २६ | सरनाईक परिषा प्रताप |
| २७ | सरनाईक विहंग प्रताप | २८ | भोईर विमल अर्जून |
| २९ | चव्हाण विक्रांत भिमसेन | ३० | पाटील कल्पना हरिश्चंद्र |
| ३१ | पाटील शारदा विजय | ३२ | डिसोजा लॅारेन्स साल्वाडोर |
| ३३ | साप्ते राजेंद्र रमेश | ३४ | लासे विजया मनोज |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | गौरी अनिता सुनील | ३६ | पाटील उमेश काशिनाथ |
| ३७ | देसाई सुहास सुर्यकांत | ३८ | महेश्वरी संजय तरे |
| ३९ | श्री. मिलिंद माधव पाटणकर | ४० | एगडे रामचंद्र हरी |
| ४१ | नंदिनी राजन विचारे | ४२ | नंदा कृष्णा पाटील |
| ४३ | वडवले संतोष वसंत | ४४ | मंदार प्रमोद विचारे |
| ४५ | वैती अशोक बारकू | ४६ | कणसे निर्मला शरद |
| ४७ | तायडे रामभाऊ महादेव | ४८ | बोरीटकर प्रभा अशोक |
| ४९ | आशा बाबासाहेब कांबळे | ५० | भोईर एकता एकनाथ |
| ५१ | शान मनप्रीत गुरमकसिंग | ५२ | जितेंद्र प्रभाकर वाघ |
| ५३ | संगिता माणिक पाटील | ५४ | शिंदे मनोज तुकाराम |
| ५५ | घाडीगांवकर संजय पांडुरंग | ५६ | काशिराम गोविंद राऊत |
| ५७ | खताळ विशाखा मधुकर | ५८ | मोरे संध्या सुनिल |
| ५९ | फाटक जयश्री रविंद्र | ६० | जानकर योगेश तातोबा |
| ६१ | जगताप अश्विनी अशोक | ६२ | फाटक रविंद्र सदानंद |
| ६३ | वेतकर दिपक विजय | ६४ | मोरे संजय भाऊराव |
| ६५ | भोसले नम्रता दिपक | ६६ | संखे मिनल मुकूंद |
| ६७ | हिराकांत बेंडू फर्डे | ६८ | म्हस्के नरेश गणपत |
| ६९ | मोरे रुचिता राजेश | ७० | पाटील सुजाता भास्कर |
| ७१ | सोनार सारिका संजय | ७२ | नारायण शंकर पवार |
| ७३ | महेश सुरेश वाघ | ७४ | कोकाटे सुधीर विष्णु |
| ७५ | वाघ पुजा गणेश | ७६ | साळवी अपर्णा मिलींद |
| ७७ | महेश जगन्नाथ साळवी | ७८ | साळवी मनोहर रामा |
| ७९ | पाटील मनाली मिलींद | ८० | मनिषा महेश साळवी |
| ८१ | केणी प्रमिला मुकूंद | ८२ | पाटील मिलींद भारत |
| ८३ | केणी मुकूंद बाळू | ८४ | महदिप भुपेंद्रसिंह बिस्ट |
| ८५ | लोखंडे सुहासिनी सुनिल | ८६ | सामंत विलास शिवराम |
| ८७ | अनिता अरुण बिर्जे | ८८ | संजय संतू वाघुले |
| ८९ | पाटील मालती रमाकांत | ९० | भरत अभिमन्यु चव्हाण |
| ९१ | रेखा भालचंद्र पाटील | ९२ | टिकमानी लक्ष्मण (लच्छू) |
| ९३ | नाईक राजश्री सुनिल | ९४ | राजे गिरीश अनंत |
| ९५ | राजेश भालचंद्र गवारी | ९६ | पाटील अवंतिका शशिकांत |
| ९७ | ठाकूर अक्षय अनंत | ९८ | यादव रिटा राजनाथ |
| ९९ | कळंबे मंगल चंद्रकांत | १०० | काकडे बालाजी दगडू |

| | | | |
|---|---|---|---|
| १०१ | कुरेशी साजिया आई | १०२ | कुरेशी यासीन अय्युब |
| १०३ | असिया यासिन कुरेशी | १०४ | भगत सुधीर रामचंद्र |
| १०५ | गोटे सिंधू कुंदन | १०६ | पाटील रेश्मा रमेश |
| १०७ | किणे राजन नारायण | १०८ | खान मिराज नईम |
| १०९ | पठाण अशरफ उस्तान | ११० | डोंगरे सिराज महम्मद अली |
| १११ | अन्सारी साजिया परवीन सरफराज | ११२ | पाटील शैलेश मनोहर |
| ११३ | मुंडे सुनिता गणेश | | |

**गैरहजर सदस्य :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरज प्रगती भारत | २ | मढवी बिंदू महेंद्र |
| ३ | उषा संजय भोईर | ४ | विलास चंदू कांबळे |
| ५ | जाधवर राधाबाई सुभाष | ६ | पांडे संजय श्रीनाथ |
| ७ | पाटील रत्नप्रभा लक्ष्मण | ८ | नजीब सुलेमान मुल्ला |
| ९ | वहिदा मुस्तफा खान | १० | हंडोरे मेघना सुनिल |
| ११ | विश्वनाथ भगत | १२ | मिर्झा जमेला तबस्सूम इनायत बेग |
| १३ | खान रऊफ अफजल | १४ | हफिजा नसीरुद्दीन नाईक |
| १५ | आशरीन इब्राहीम राऊत | १६ | शेख रजिया इकबाल |
| १७ | हिरा सिताराम पाटील | | |

मा.महापौर सो. छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळयास पुष्पहार अर्पण करतात.
तद्नंतर वंदे मातरम् होऊन ठिक दुपारी १२.०० वाजता सभेस सुरुवात होते.
मा.महापालिका सचिव मा.सर्वसाधारण सभेचे परिपत्रक वाचून दाखवितात.

**मा.महापालिका सचिव :-**

मा.महापौर महोदय, आजच्या सभेसमोर एकूण दोन सभा तहकूबी प्राप्त झाल्या आहेत. सदरच्या सभा तहकूबी मी या ठिकाणी वाचून दाखवतो.

पहिल्या सभा तहकूबीचे सुचक मा.उप महापौर,श्री. मुकेश मोकाशी आणि अनुमोदक श्री. संजय वाघुले आहेत

प्रति, दिनांक : ७ जून २०१४

**मा.महापौर सो.,**
ठाणे महानगरपालिक,ठाणे.

**विषय : सभा तहकूबी सूचना**

**महोदय,**

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय नेते व केंद्रीय ग्रामविकास मंत्री, गृहनेते , तसेच लोकनेते म्हणून सर्वपरिचीत श्री. गोपीनाथजी मुंडे हयांचे मंगळवार दिनांक ३ जून २०१४ रोजी सकाळी अपघाती दुर्दैवी निधन झाले. त्यावेळी ते ६४ वर्षाचे होते. देशाने एक कर्तृत्ववान नेता गमावला आहे. भारतीय जनता पक्ष आणि स्वत: गोपीनाथजी मुंडे हयांच्या राजकिय वाटचालीचा एक धवल अध्याय सुरु झालेला असतानाच, अचानक मुंडे हयांचा जीवनप्रवास संपला. कै. गोपीनाथजी मुंडे यांच्या अपघाती निधनाने केवळ त्यांच्या परळी मतदार संघावरच शोककळा पसरली नाही तर संपूर्ण महाराष्ट्र या लोकनेत्याच्या अकाली निधनाने पोरका झाला. संपूर्ण महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षात कै. मुंडे हयांच्या निधनाने मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

१२ डिसेंबर १९४९ रोजी एका सामान्य शेतकरी कुटूंबात बीड जिल्हयातील परळी तालुक्यात कै.गोपीनाथजी मुंडे हयांचा जन्म झाला. कोणतीही राजकिय पार्श्वभूमी नसलेल्या सामान्य कुटूंबात जन्माला आलेले कै. गोपीनाथजी मुंडे यांनी अन्यायाविरुध्द अविरत संघर्ष केला. सर्वांना बरोबर घेत राज्याच्या विकासाला गती देणारे स्व.गोपीनाथजी हे ख-या अर्थाने लोकनेते ठरले. १९६९ मध्ये कै. गोपीनाथजी मुंडे हयांच्या राजकिय प्रवासाला सुरुवात झाली. त्यावेळी अंबेजागाईला ते हॉस्टेलमध्ये रहात असत. मुलांना सोलापूरला घेऊन जायचे आहे. एस.टी.ची व्यवस्था कर असे त्यांचे निकटचे स्नेही कै.प्रमोदजी महाजन हयांनी त्यांना सांगितले. त्यावेळी मुलांच्या आग्रहाखातर त्या गाडीमध्ये चढलेले कै.गौपीनाथजी मुंडे अखेरपर्यंत त्यातून उतरु शकले नाहीत. अभविपमध्ये सामिल झालेले कै. गोपीनाथजी मुंडे हे दुस-याच वर्षी संघटनेचे मंत्री झाले. त्यानंतर संघाचे कार्य त्यांनी आपल्या खांदयावर घेतले. दरम्यानच्या काळात त्यांनी एलएलबीचा अभ्यास सुरु ठेवला होता. संघशिक्षक म्हणून काम करता करता ते पुण्यामध्ये संघाचे कार्यवाह झाले.

१९७५ मध्ये जाहिर झालेल्या आणिबाणीच्या काळात वसंतराव भागवतांनी कै.मुंडे हयांना मराठवाडयात जायला सांगितले आणि औरंगाबाद शहर प्रमुख म्हणून त्यांची नियुक्ती देखिल केली.
९ ऑगस्ट रोजी झालेल्या आणीबाणीच्या निदर्शनांमध्ये त्यांना अटक होऊन त्यांची रवानगी जेलमध्ये झाली. त्याच वेळी कै.प्रमोदजी महाजन देखिल जेलमध्ये होते. या आणीबाणीच्या काळात कै. मुंडे व कै. प्रमोदजी महाजन हयांची मैत्री अधिकच घट्ट झाली. १९७७ मध्ये त्यांची जेलमधून सुटका झाली. त्यानंतर कै.गोपीनाथजी मुंडे हयांनी निवडणूक लढवली ती विधानसभेची. त्या निवडणूकीतील त्यांच्या पराभवानंतर

त्यांनी  जिल्हा परिषदेच्या उजनी मतदार संघातून लढविलेल्या निवडणूकीमध्ये विक्रमी मताधिक्य मिळविले आणि ते विजयी झाले.

पुलोदचे सरकार आले त्या काळात कै. प्रमोदजी महाजन हयांच्या बरोबरीने त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या प्रचारामध्ये सक्रीय सहभाग घेतला. १९८५ मध्ये भारतीय जनता पार्टीचे ते केंद्रीय सेक्रेटरी झाले. आणि त्यानंतर १९८६ मध्ये राज्याचे भाजपा अध्यक्ष झाले. आरक्षण, मंडल आयोग, शेतक-यांचे प्रश्न आदी मुद्दयांवर त्यांनी अत्यंत गांभिर्याने लक्ष वेधले होते. १९८७ मध्ये शेतक-यांच्या कर्जमुक्तीसाठी त्यांनी फार मोठे आंदोलन केले. त्याच काळात भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेची युती करण्याबाबत चर्चा सुरु झाली. प्रत्यक्ष युती १९९० मध्ये अस्तित्वात आली. त्यांनतर झालेल्या निवडणूकीमध्ये विरोधी पक्षनेते पद कै. मुंडे यांच्याकडे आले.

उप मुख्यमंत्री म्हणून पद भुषवितांना कै.गोपीनाथजी मुंडे हयांनी अनेक चांगल्या योजना आणल्या. गरिबांकरिता मोफत घर हे त्यापैकी एक उदाहरण !  गेल्या लोकसभेत पक्षाचे उपनेते म्हणून त्यांनी उत्तम योगदान दिले होते.

आपल्याला मिळालेल्या यशापेक्षा सामान्य जनतेमध्ये निर्माण केलेला विश्वास आणि पदाचा योग्यप्रकारे वापर करुन आपल्या मतदार संघाचे प्रश्न प्रभावीपणें मांडण्याची किमया कै. गोपीनाथजी मुंडे यांना साधली  होती आणि त्यामुळेच आपल्या विभागाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने ते नियोजनबध्द पावले उचलत होते.

अशा या लोकनेत्याल्या केंद्रीय मंत्रीपदाच्या रुपाने पुन्हा एकदा एक नविन संधी ती देखिल भारतीय जनता पक्षाचे सार्वभौम असे सरकार स्थापन झालेले असताना मिळाली होती. या संधीचा उपयोग करुन ग्रामविकासाच्या माध्यमातून खेडयांकरिता आणि शेतक-यांकरिता योजना आखण्याचा विचार असतानांच थोडयाच कालावधीमध्ये अगदी शपथविधीनंतर अवध्या आठच दिवसांत काळाने त्यांच्यावर घातलेल्या क्रूर आघाताने त्यांना आपल्यातून हिरावून  घेतले.

तळागाळातील माणसाच्या घराघरापर्यंत कै. गोपीनाथजी मुंडे जाऊन पोहोचले होते आणि म्हणूनच ते लोकनेते म्हणून लोकप्रिय होते. त्यांच्या अंत्यविधीच्या प्रसंगी त्या ठिकाणी हजर राहिलेल्या जनसागराच्या रुपानेच कै. गोपीनाथजी मुंडे हयांची लोकप्रियता सर्व जगाने आपल्या डोळयांनी पाहिली. अभूतपूर्व असा शोकाकूल जनसागर परळी येथे लोटला होता.

कै. गोनीनाथजी मुंडे हयांच्या या आकस्मिक दुर्दैवी निधनाने त्यांचे केवळ कुटूंबियच नव्हे तर संपूर्ण मराठवाडयासह महाराष्ट्र देखिल पोरका झालेला आहे. कै. मुंडे हयांच्या निधनाने भारतीय जनता पक्षात निर्माण झालेली पोकळी भरुन निघणारी नाही.

कै.गोपीनाथजी मुंडे हयांच्या कुटूंबियांसह सर्व जनतेस व मित्रपरिवारांस झालेल्या दु:खात सहभागी होऊन, कै.गोपीनाथजी मुंडे हयांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन ही सर्वसाधारण सभा पूर्णपणे तहकूब करण्यांत यावी अशी सूचना करीत आहे.

सुचक :- श्री. मुकेश मधुकर मोकाशी

अनुमोदक :- श्री. संजय संतू वाघुले

**मा.महापालिका सचिव :-**

मा.महापौर महोदय, दुस-या सभा तहकूबीचे सुचक सन्मा. सभागृहनेते श्री. नरेश म्हस्के व अनुमोदक सन्मा. विरोधी पक्षनेते श्री. हणमंत जगदाळे साहेब आहेत.

प्रति, दिनांक : १६ जून २०१४

**मा.महापौर सो.,**

ठाणे महानगरपालिक,ठाणे.

**विषय : सभा तहकूबी सूचना**

**महोदय,**

आगामी सर्वसाधारण सभेपुढे खालील सभा तहकूबी सूचना घेण्यांत यावी ही विनंती.

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय नेते व केंद्रीय ग्रामविकास मंत्री, गृहनेते, तसेच लोकनेते म्हणून सर्वपरिचीत श्री.गोपीनाथजी मुंडे हयांचे मंगळवार दिनांक ३ जून २०१४ रोजी सकाळी वयाच्या ६४ व्या वर्षी अपघाती दुर्दैवी निधन झाले. भारतीय जनता पक्ष आणि स्वत: गोपीनाथजी मुंडे हयांच्या कारकिर्दीला उत्तम वळण मिळालेले असतांनाच झालेल्या अपघाताने भारतीय जनता पक्ष आणि संपूर्ण देश एका कर्तृत्ववान नेत्याला मुकला आहे.

कै.गोपीनाथजी मुंडे हयांचा जन्म १२ डिसेंबर १९४९ रोजी एका सामान्य शेतकरी कुटूंबात बीड जिल्हयातील परळी तालुक्यात झाला. सर्वसामान्य शेतकरी कुटूंबात जन्माला आलेल्या कै.गोपीनाथजी मुंडे हयांनी सर्वसामान्यांवर होणा-या अन्यायाला वाचा फोडण्याचा वसा घेतला होता. आणि त्यामुळेच तळागाळातील सर्व कार्यकर्त्यांना बरोबर घेत राज्याच्या विकासाला गती देणारे स्व.गोपीनाथजी हे ख-या अर्थाने लोकनेते ठरले.

सन १९६९ मध्ये निकटचे स्नेही कै.प्रमोदजी महाजन हयांच्या सांगण्यावरुन आंबेजोगाई येथील हॉस्टेलमधून मुलांना सोलापूर येथे घेऊन निघालेल्या स्व.गोपीनाथजींच्या राजकीय प्रवासाला देखिल सुरुवात झाली.

१९७५ मध्ये जाहिर झालेल्या आणीबाणीच्या काळात वसंतराव भागवतांनी कै.मुंडे हयांची औरंगाबाद शहर प्रमुख म्हणून त्यांची नियुक्ती केली. दरम्यानच्या काळात निदर्शनांच्या कारणास्तव स्व.गोपीनाथजी मुंडे हयांना कारावास पत्करावा लागला. या दरम्यान कै.प्रमोदजी महाजन हे देखिल तुरुंगात होते त्याच काळात या दोघांमधील मैत्रीचे बंध अधिकच घट्ट झाले. १९७७ मध्ये त्यांची जेलमधून सुटका झाली.

तुरुंगातून सुटका झाल्यानंतर स्व.गोपीनाथजी मुंडे हयांची आपली पहिली विधानसभा निवडणूक लढविली. परंतू त्यात त्यांचा पराभव झाला. मात्र त्यानंतर झालेल्या जिल्हापरिषद निवडणूकीमध्ये उजनी मतदार संघातून विक्रमी मताधिक्याने ते विजयी झाले.

देशात पुलोदचे सरकार आले त्या काळात कै.प्रमोदजी महाजन हयांच्या बरोबरीने त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या प्रचारामध्ये सक्रीय सहभाग घेतला. १९८५ मध्ये भारतीय जनता पार्टीचे ते केंद्रीय सेक्रेटरी त्यानंतर १९८६ मध्ये राज्याचे भाजपा अध्यक्ष असा स्व.गोपीनाथजींचा प्रवास सुरु होता. या दरम्यान आरक्षण, मंडल आयोग, शेतक-यांचे प्रश्न आदी मुद्दयांवर त्यांनी अत्यंत गांभिर्याने सरकारचे लक्ष वेधले होते. १९८७ मध्ये शेतक-यांच्या कर्जमुक्तीसाठी त्यांनी फार मोठे आंदोलन केले. १९९० मध्ये भारतीय

जनता पक्षाने शिवसेनेबरोबर युती जाहिर केली. त्यानंतर झालेल्या निवडणूकीमध्ये विरोधी पक्षनेतेपद कै.मुंडे यांच्याकडे आले.

उपमुख्यमंत्री म्हणून पद भुषवितांना कै.गोपीनाथजी मुंडे हयांनी अनेक चांगल्या योजना आणल्या. गरिबांकरिता मोफत घर हे त्यापैकी एक उदाहरण ! गेल्या लोकसभेत पक्षाचे उपनेते म्हणून त्यांनी उत्तम योगदान दिले होते.

राजकारणात मोठे व्हायचे असेल तर आपला शत्रुही तेवढाच मोठा असला पाहिजे हे माहिती असलेल्या कै.मुंडे हयांनी त्याच दृष्टीने सातत्याने आपली राजकीय पावले उचलली. मुंडे हयांना काँग्रेस-राष्ट्रवादीमधील आपल्या विरोधकांशी जेवढा संघर्ष करावा लागला तेवढाच पक्षांतर्गत विरोधकांशी सामना करावा लागला. आपल्याला मिळालेल्या यशापेक्षा सामान्य जनतेमध्ये निर्माण केलेला विश्वास आणि पदाचा योग्य प्रकारे वापर करुन आपल्या मतदार संघाचे प्रश्न प्रभावीपणे मांडणीची किमया कै.गोपीनाथजी मुंडे यांना साधली होती. अशा या लोकनेत्याला केंद्रीय मंत्रीपदाच्या रुपाने पुन्हा एकदा एक नविन संधी ती देखिल भारतीय जनता पक्षाचे सार्वभौम असे सरकार स्थापन झालेले असतांना मिळाली होती. या संधीचा उपयोग करुन ग्रामविकासाच्या माध्यमातून खेडयांकरिता आणि शेतक-यांकरिता योजना आखण्याचा विचार असतांनाच थोडयाच कालावधीमध्ये अगदी शपथविधीनंतर अवघ्या आठच दिवसात काळाने त्यांच्यावर घातलेल्या क्रूर आघाताने त्यांना आपल्यातून हिरावून घेतले.

तळागाळातील माणसाच्या घराघरापर्यंत कै.गोपीनाथजी मुंडे जाऊन पोहोचले होते. आणि म्हणूनच ते लोकनेते म्हणून लोकप्रिय होते. त्यांच्या अंत्यविधीच्या प्रसंगी त्या ठिकाणी हजर राहिलेल्या जनसागराच्या रुपानेच कै.गोपीनाथजी मुंडे हयांची लोकप्रियता सर्व जगाने आपल्या डोळयांनी पाहिली. अभूतपूर्व असा शोकाकूल जनसागर परळी येथे लोटला होता.

कै.गोपीनाथजी मुंडे हयांच्या या आकस्मिक दुर्दैवी निधनाने त्यांचे केवळ कुटूंबियच नव्हे तर संपूर्ण मराठवाडयासह महाराष्ट्र देखिल पोरका झालेला आहे. कै.मुंडे हयांच्या निधनाने भारतीय जनता पक्षात निर्माण झालेली पोकळी भरुन निघणारी नाही.

कै.गोपीनाथजी मुंडे हयांच्या कुटूंबियांसह सर्व जनतेस व मित्रपरिवारांस झालेल्या दु:खात सहभागी होऊन, कै.गोपीनाथजी मुंडे हयांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन ही सर्वसाधारण सभा पूर्णपणे तहकूब करण्यांत यावी अशी सूचना करीत आहे.

सूचक : - श्री.नरेश म्हस्के

अनुमोदक : श्री.हणमंत जगदाळे

**श्री. संजय वाघुले :-**

मा.महापौर महोदय, महाराष्ट्राचे लोकनेते स्व. गोपीनाथजी मुंडे हयांचे मंगळवार ३ जून २०१४ रोजी दिल्ली हया ठिकाणी अपघाती निधन झाले. आणि महाराष्ट्रावर आणि भारतीय जनता पक्षावर शोककळा परसली. कै. गोपीनाथजी मुंडे हयांचा जन्म बीड जिल्यातील परळी हया ठिकाणी झाला होता. लहानपणीच त्यांनी शाळेय जीवनात विदयार्थी क्षेत्रात उडी घेतली. कॉलेज जीवनात त्यांनी भारतीय विदयार्थी परिषद, त्यानंतर भरतीय जनता पार्टीमध्ये काम करत असताना भारतीय जनता पार्टीचे युवा मोर्चा अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष, तसेच भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना युतीची जेंव्हा सत्ता आली ती सत्ता आल्यानंतर त्यांना उप मुख्यमंत्री पद दिल्यानंतर गृहमूंत्री म्हणून त्यांना चांगल्या प्रकारे आपल्या कामाचा ठसा उमटविला. त्यानंतर भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय सरचिटणीस म्हणून त्यांची नेमणूक झाली. महाराष्ट्रातील तळागाळातील नागरिकांची नस ओळखणारा हा नेता होता. मा.शरद पवारांनंतर महाराष्ट्रामध्ये ज्या नेत्याला जाण होती. प्रत्येक गावामध्ये जाऊन त्या गावाच्या समस्येची जाण असणारा हा नेता होता. त्यांच्या आकस्मिक निधनामुळे भारतीय जनता पार्टीचे तसेच महाराष्ट्रातील ग्रामिण भागातील जनतेचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. नुकतीच त्यांची केंद्रीय ग्रामविकास मंत्री म्हणून नेमणूक झाली होती. आणि त्यामुळे महाराष्ट्राचे सर्वत्र आनंदाचे वातावरण असतानाच नियतीने त्या ठिकाणी आघात केला आणि ते आपल्याला सोडून निघून गेले. त्यांच्या जाण्यामुळे भारतीय जनता पार्टीची कधीही भरुन न येणारी तुट झाली आहे. भारतीय जनता पार्टी ठाणे शहरातर्फे तसेच भारतीय जनता पार्टी पक्षातर्फे, ठाणेकर नागरिकांतर्फे मी या ठिकाणी कै. गोपीनाथजी मुंडे हयांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहून आजची सर्वसाधारण सभा तहकूब करावी अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो. ओम शांती.

**श्री.रामभाऊ तायडे :-**

मा.महापौर महोदय, कै. गोपीनाथजी मुंडे साहेब आपल्यातून निघून गेलेत. खरंतर संघर्ष करणारा नेता, गोरगरिबांचा नेता, शेतक-यांचा नेता, आंबेडकरी समाजाचा नेता असा नेता आज महाराष्ट्रातून आपल्यातून निघून गेला आहे. आर.सी.एच्. च्या संपर्कातून येऊन त्यांचे विचार,आचार घेऊन ते वाढलेले होते. मुंडे साहेब, महाराष्ट्रामध्ये परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ घेऊन हे सतत प्रयत्न करत होते. त्यांना मानणारा सर्वच समाजातील वर्ग होता. म्हणजेच ते एका जाती पुरतेच मर्यादित नव्हते. म्हणून आज ते लोकनेते ठरले. त्यांच्यासाठी सर्व भारत रडलेला आहे. ते आपण दुरदर्शनवर पाहिलेले आहे. महाराष्ट्रामध्ये असे तीनच नेते आहेत. शरद पवार सहोब, मा.आठवले साहेब आणि मुंडे साहेब. हया नेत्यांची नाळ त्यांच्या कार्यकर्त्यासोबत जुळली होती. म्हणजेच ते कार्यकत्यांना नावाने ओळखणारे नेते आहेत. हयांच्यामधून आज गोपीनाथजी मुंडे साहेब गेलेले आहेत. त्यांनी नामांतरासाठी मोठा लढा दिलेला आहे. नामांतरासाठी मा.बाळसाहेबांना भेटून त्यांच्यासोबत सुध्दा त्यांनी संघर्ष केला होता. माझ्या माहितीप्रमाणे हया लढयाच्या वेळी ते जेलमध्ये सुध्दा गेले होते. आणि नामांतराचा तो लढा त्यांनी यशस्वी केला. आंबेडकर चळवळीसाठी हा जो आत्मा होता. तो आत्मा निघून गेलेला आहे आणि आंबेडकर चळवळ आज पोरकी झालेली आहे असे मला वाटते. मी कै. गोपीनाथजी मुंडे साहेबांना माझ्या तायडे परिवाराच्या वतीने, रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया, ठाणे जिल्हयाच्यावतीने मी या ठिकाणी श्रध्दांजली अर्पण करतो. जय भीम, जय भारत, जय महाराष्ट्र..

**श्री.मिलिंद पाटणकर :-**

मा.महापौर महोदय, ३ जुन रोजी आकस्मिकपणे सकाळी ८.०० च्या सुमारास टी.व्ही.वर किंवा फोन आले की, मा.मुंडे साहेबांना अपघात झाला आहे आणि सुरुवातीला ते सिरिअस आहेत आणि नंतर १५ मिनिटांतच त्यात त्यांचा दुर्देवी मृत्यु झालेला आहे अशी बातमी आली. खरे म्हणजे जवळजवळ तास, दोन तास त्या बातमीवर कोणी विश्वास ठेवायलाच तयार नव्हते. प्रत्येक जण एकमेकांना विचारुन खात्री करुन घेण्याचा प्रयत्न करीत होता की, हे खरेच झालेले आहे का? अशी काही घटना खरेच झालेली आहे की फक्त अफवा पसरवली गेलेली आहे. इतकी ती घटना आकस्मिक आणि दुर्देवी होती. महाराष्ट्रातील १० कोटी जनतेचे आणि भारतातील तेवढयाच लोकांचे मुंडे साहेबांवर अतोनात प्रेम असल्यामुळे सर्वच लोक या विचारात होते की, असे घडले कसे? माझ्याजवळ बोलताना एका व्यक्तीने असे म्हटले की, दुर्देव-दुर्देव म्हणतात ते याहून जास्त काही असेल असे मला वाटत नाही. स्व.प्रमोद महाजनांच्या मृत्युनंतर कौटुंबिक घाला आणि कौटुंबिक समस्येमध्ये मुंडे साहेब एवढे ग्रासले गेले होते. त्यातच त्यांना खूप त्रास होत होता, त्यांची शारिरीक प्रकृती ढासळली होती. त्यांना डायबिटीस होते आणि स्पॉनडिलायसीसचा त्रास सुरु झाला. हे सर्व त्रास ते भोगत असताना पुन्हा एकदा उभारी घेऊन आणि महाराष्ट्रात पूर्ण फिरुन आणि अनेक सभा घेऊन महाराष्ट्रातील युतीच्या ४३ जागा निवडून आणण्यात मुंडे साहेबांचा फार मोठा वाटा होता आणि आता त्यांना केंद्रीय कॅबिनेट दर्जाचे पद मिळाले होते. हे ग्रामविकास डिपार्टमेंट त्यांच्या आवडीचे होते आणि मोठया उत्साहाने ते कार्यकर्त्यांशी बोलायला लागले होते की आता बघा मी कसे काम करुन दाखवितो, ग्रामविकास हा माझा आवडता विषय आहे. ग्रामीण विभागाचा विकास करणे, डेव्हलपमेंट करणे यासाठी आता मी माझे पूर्ण आयुष्य घालवीन आणि विकास करुन दाखवेन. अशाप्रकारचा उत्साह त्यांच्यामध्ये होता आणि त्यातच युतीमधील लोक त्यांचे नाव महाराष्ट्राचे भावी मुख्यमंत्री म्हणून म्हणायला लागले होते. अशा या सुखद प्रसंगी अशी दुर्देवी घटना घडली. नियतीच्या मनात काय असते हे कधीच कोणालाच कळत नाही. १९७५सालच्या आधीपासून राजकारणात उतरलेले मुंडे साहेब यांनी आणीबाणीची जेल त्यांनी सोसली नंतर अनेक प्रकारची आंदोलने केली. मराठवाडयात खूप मोठे आंदोलन केले आणि विदर्भात शेतक-यांचा कर्जमुक्तीचा मोठा मोर्चा काढला आणि भारतीय जनता पार्टीला त्यांनी हा हा म्हणता जनमाणसापर्यंत पोहोचविले. तोपर्यंत भारतीय जनता पार्टीला ब्राम्हण आणि व्यापा-यांची पार्टी असे संबोधले जायचे. मुंडे साहेबांनी या पक्षाला तळागाळातील माणसाच्या मनात नेऊन बसविले आणि याचे फार मोठे श्रेय मुंडे साहेबांना आहे. त्यामुळे भारतीय जनता पक्षाला मुंडे साहेबांच्या निधनानंतर एकदमच पोरके झाल्यासारखे वाटायला लागले. महाराष्ट्र पण पोरका झाला कारण महाराष्ट्रातील हातावर मोजण्याइतके ३-४ नेते आहेत, ज्यांना महाराष्ट्राची संपूर्ण माहिती होती आणि त्यांचे दिल्लीत पण वजन होते. आधीच्या दोन्ही वक्त्यांनी शरद पवार साहेबांचे नाव घेतलेले आहे, एक प्रमोदजी महाजन होते आणि आता गोपीनाथ मुंडे होते, विलासराव देशमुख एक होते की ज्यांचे दिल्लीत वजन होते आणि त्यांना महाराष्ट्राची माहिती होती. आणि महाराष्ट्राचे दुर्देव असे चौघांपैकी तीन जणांचा दुर्देवी मृत्यु झालेला आहे. त्यामुळे महाराष्ट्राला अजुन किती पोरके व्हायचे आहे याबद्दल महाराष्ट्रातील लोक चिंता करतात की असे व्हायला नको होते. मुंडे साहेबांनी १९९५ साली महाराष्ट्रात जी युतीची सत्ता आली त्यात त्यांनी आधी काढलेली संघर्ष यात्रा की ज्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला त्यात संघर्ष यात्रेचा फार मोठा वाटा होता. त्यावेळेला मुंडे साहेबांनी राजकारणातील गुन्हेगारीकरण हा मुद्दा मोठया प्रमाणात जनमाणसात बिंबवला. लोकांना हे पटायला लागले की, राजकारणातील गुन्हेगारीकरण कमी झाले पाहिजे. त्या संघर्ष यात्रेचा फार मोठा परिणाम युतीची सत्ता येण्यासाठी झाला. गृहमंत्री म्हणून त्यांची कारकिर्द तर अतिशय चांगली होती. दंगे नाही झाले असे जरी आपण मानत असलो तरी मुंडे साहेबांचा अशाप्रकारे एका

छोटयाशा निमित्ताने अंत होणे हे खरोखर महाराष्ट्राच्या आणि देशाच्या दृष्टीने भयानक अशी घटना आहे. याचे परिणाम कदाचित महाराष्ट्राला भोगावे लागणार आहेत. मी या प्रसंगी एवढंच भाष्य करतो की, असा प्रसंग पुन्हा महाराष्ट्रावर येऊ नये. हे सर्व महाराष्ट्राचे दुर्दैव आहे, भारतीय जनता पक्षाचे दुर्दैव आहे आणि त्यांच्या कुटुंबियांना, भारतीय जनता पक्षाला आणि आमच्यासारख्या सर्व कार्यकर्त्यांना हे दुःख सोसण्याची ताकद परमेश्वर देवो. त्यांच्या कुटुंबियांना हे दुःख सोसण्याची ताकद मिळो कारण आज त्यांना खरी गरज आहे. एवढे बोलून आजची ही सभा स्व.मुंडे साहेबांच्या निधनामुळे संपूर्णपणे तहकुब करावी अशी पुन्हा एकदा विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

**मा. विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय नेते आणि महाराष्ट्राचा बहुजन विकास चेहरा गोपीनाथरावजी मुंडे यांच्या ३ जुन, २०१४ रोजी आकस्मिक निधनाने संपूर्ण महाराष्ट्रावर श्री.मिलिंद पाटणकर यांनी सांगितल्याप्रमाणे सकाळी ८.०० च्या दरम्यान टी.व्ही.वर बातम्या सुरु झाल्या त्यावेळेला कोणाचाही विश्वास या बातमीवर बसलेला नव्हता. एक आक्रमक व्यक्तिमत्व, शेतकरी कुटुंबात जन्म घेऊन खेडयापाडयामधील गरीबांचे दुःख, सर्वसामान्यांचे दुःख जाणून समाजकार्यामध्ये उडी घेऊन निश्चितच प्रकारे एक चांगल्याप्रकारचे एक आक्रमक काम गोपनीथजी मुंडे यांनी त्यांच्या काळात केलेले आहे आणि एक आक्रमक व्यक्तिमत्व महाराष्ट्राच्या दृष्टीने आशादायक होते. त्यांच्या मेहनतीने, चिकाटीने लोकसभेमध्ये चांगल्याप्रकारचे यश मिळवून ग्रामविकाससारखे चांगले खाते त्यांना मिळाले होते. त्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्राचा विकास करण्याची भुमिका आखलेली होती. असे सर्व होत असताना अशाप्रकारची दुःखद घटना घडली हे फक्त भारतीय जनता पक्षासाठीच नव्हे तर महाराष्ट्रासाठी हानीकारक अशाप्रकारची बातमी तुमच्या आमच्यावर आदळल्यानंतर महाराष्ट्रातील तमाम जनता दुःखात वाहून गेली आणि त्यावेळेला त्या ठिकाणी जो जनसागर होता आणि जनसागराच्या ज्या भावना होत्या त्या आपण सर्वांनी पाहिलेल्या आहेत. पवार साहेबांनी देखील त्या दिवशी म्हटले होते की, गोपीनाथराव मुंडे साहेबांनी विरोधी पक्ष नेते म्हणून अतिशय उल्लेखनीय असे काम केलेले आहे. त्यांच्या कामामध्ये त्यांना ज्या ज्या ठिकाणी संधी मिळाली, त्या त्या ठिकाणी त्यांनी निश्चितच चांगले काम केले. सत्ता नसताना सुध्दा गरीबांचे प्रश्न सोडविण्याची भुमिका त्यांनी सातत्याने मांडली. असा महाराष्ट्राचा एक लढवय्या नेता आपल्यामधून गेल्यानंतर महाराष्ट्रातील जनतेची फार मोठी हानी झालेली आहे. व्यक्ती गेल्यानंतर अशा प्रकारची हानी भरुन येत नाही. परंतु अशाप्रकारचे नेतृत्व लक्षात ठेवून इतरांनी काम करायला पाहिजे. कारण गोपीनाथराव मुंडे हे ग्रामीण भागाचे एक उमदे आणि तळागाळातील लोकांचे असे नेतृत्व होते. प्रत्येक खेडेगावामध्ये जाऊन बहुजन समाजाच्या लोकांचे प्रश्न सोडविण्याची भुमिका त्यांनी सातत्याने घेतली होती. त्यांच्या निधनामुळे केवळ त्यांचे कुटुंबियच नव्हे तर संपूर्ण मराठवाडा आणि महाराष्ट्र पोरका झाला असून, त्यांच्या निधनामुळे एक मोठी राजकीय पोकळी निर्माण झालेली आहे. अशा या महान लोकनेत्यास मी माझ्या वतीने, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने, लोकशाही आघाडीच्या वतीने या ठिकाणी भावपूर्ण श्रध्दांजली वाहून ही सभा पूर्ण दिवसासाठी तहकुब करावी अशाप्रकारची विनंती करतो.

**श्री. संतोष वडवले , (सभागृह नेते):-**

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय नेते व केंद्रीय ग्रामविकास मंत्री, गृहनेते तसेच लोकनेते म्हणून सर्वपरिचित श्री. गोपीनाथजी मुंडे हयांचे मंगळवार दिनांक ३ जून २०१४ रोजी सकाळी वयाच्या ६४ व्या वर्षी अपघाती निधन झाले. भारतीय जनता पक्ष आणि स्वतः गोपीनाथजी मुंडे हयांच्या कारकिर्दीला उत्तम

वळण मिळालेले असतानाच झालेल्या अपघाताने भारतीय जनता पक्ष आणि संपूर्ण देश एका कतृत्त्ववान नेत्याला मुकला आहे.

कै. गोपीनाथजी मुंडे हयांचा जन्म १२ डिसेंबर रोजी एका सामान्य शेतकरी कुटूंबात बीड जिल्हातील परळी तालुक्यात झाला. सर्वसामान्य शेतकरी कुटूंबात जन्माला आलेल्या कै.गोपीनाथजी मुंडे हयांनी सर्वसामान्यांवर होणा-या अन्यायाला वाचा फोडण्याचा वसा घेतला होता. आणि त्यामुळेच तळागाळातील सर्व कार्यकत्यांना बरोबर घेत राज्याच्या विकासाला गती देणारे स्व. गोपीनाथजी हे ख-या अर्थाने लोकनेते होते. सन १९६९ मध्ये निगटचे स्नेही कै. प्रमोदजी महाजन हयांच्या सांगण्यावरुन आंबेजोगाई येथील हॉस्टेलमधून मुलांना सोलापूर येथे घेऊन निघालेल्या स्व.गोपीनाथजींच्या राजकिय प्रवासाला सुरुवात झाली.

सन १९७५ मध्ये जाहिर झालेल्या आणिबाणीच्या काळात वसंतराव भागवतांनी कै.मुंडे हयांची औरंगाबाद शहर प्रमुख म्हणून नियुक्ती केली. दरम्यानच्या काळात निदर्शनांच्या कारणास्तव स्व. गोपीनाथजी मुंडे हयांना करावास पत्करावा लागला. या दरम्यान कै. प्रमोदजी महाजन हे देखिल तुरुंगात होते. त्याच काळात या दोघांमधील मैत्रीचे बंध अधिकच घट्ट झाले. सन १९७७ मध्ये त्यांची जेलमधून सुटका झाली. तुरुंगातून सुटका झाल्यानंतर स्व.गोपीनाथजी मुंडे हयांनी आपली पहिली विधानसभा निवडणूक लढवली. परंतू त्यात त्यांचा पराभव झाला. मात्र त्यानंतर झालेल्या जिल्हा परिषद निवडणूकीमध्ये उजनी मतदार संघातून विक्रमी मताधिक्याने ते विजयी झाले.

देशात पुलोदचे सरकार आले व त्याकाळात कै.प्रमोदजी महाजन हयांच्या बरोबरीने त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या प्रचारामध्ये सक्रिय सहभाग घेतला. सन १९८५ मध्ये भारतीय जनता पार्टीचे ते केंद्रीय सेक्रेटरी त्यानंतर १९८६ मध्ये राज्याचे भाजपा अध्यक्ष असा स्व. गोपीनाथजींचा प्रवास सुरु होता. या दरम्यान आरक्षण, मंडल आयोग, शेतक-यांचे प्रश्न आदी मुदयांवर त्यांनी अत्यंत गांभिर्याने सरकारचे लक्ष वेधले होते. सन १९८७ मध्ये शेतक-यांच्या कर्जमुक्तीसाठी त्यांनी फार मोठे आंदोलन केले. १९९० मध्ये भारतीय जनता पक्षाने शिवसेनेबरोबर युती सहिर केली. त्यानंतर झालेल्या निवडणूकीमध्ये विरोधी पक्षनेते पद कै. मुंडे यांचेकडे आले.

महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री म्हणून पद भुषवितांना कै. गोपीनाथजी मुंडे यांनी अनेक चांगल्या योजना आखल्या. गरिबांकरीता मोफत घर याचा मला या ठिकाणी आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. मागील लोकसभेत पक्षाचे उपनेते म्हणून त्यांनी यशस्वीपणे कामगिरी बजावली असेही मला या ठिकाणी सांगावेसे वाटते.

गोपीनाथजी मुंडे यांनी मतदार संघाचे प्रश्न प्रभावी व प्राधान्याने सोडविण्याची किमया कै.गोपीनाथजी मुंडे हयांना आत्मसात होती.

अशा या महान व लोकप्रिय नेत्याला केंद्रीय मंत्रीपदाच्या रुपाने पुन्ही एकदा एक संधी मिळाली परंतू या संधीचा फायदा करुन ग्रामविकासाच्या माध्यमातून खेडयांकरीता आणि शेतक-यांकरीता योजना आखण्याचा विचार असतानांच थोडयाच कालावधीमध्ये अगदी शपथविधीनंतर अवघ्या आठच दिवसांत काळाने त्यांच्यावर घातलेल्या क्रुर आघाताने त्यांना आपल्यातून हिरावून घेतले.

तळागाळातील माणसांच्या घराघरापर्यंत कै.गोपीनाथजी मुंडे जाऊन पोहचले होते आणि म्हणूनच ते लोकनेते म्हणून सर्वज्ञात झाले. त्यांच्या अंत्यविधीच्या प्रसंगी त्या ठिकाणी हजर राहिलेल्या जनसागराच्या रुपाने अभूतपूर्वक असा शोकाकूल जनसागर परळी येथे दिसून आला.

५

कै. गोपीनाथजी मुंडे हयांच्या या आकस्मित दुर्दैवी निधनाने त्यांचे केवळ कुटुंबीयच नव्हेतर संपूर्ण मराठवाडयासह महाराष्ट्र देखिल पोरका झालेला आहे. त्यांच्या निधनामुळे भारतीय जनता पक्षात निर्माण झालेली पोकळी कधीच भरुन निघणे शक्य नाही. त्यांच्या निधनाने एका संघर्षयात्रेची अखेर झालेली आहे.

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय नेते व केंद्रीय ग्रामविकास मंत्री तसेच लोकनेते कै.गोपीनाथ मुंडे हयांच्या मुंडे कुटूंबीयांवर दु:खाची कु-हाड कोसळली असून त्यांना हे दु:ख सहन करण्याची ताकद देवा अशी मी ईश्वर चरणी प्रार्थना करतो आणि माझे दोन शब्द संपवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र..

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, ज्या वेळी आपण ही तहकुब सभा पुन्हा लावणार आहात त्यावेळेला क्लस्टर डेव्हलपमेंटचे जे विषय आहेत ते पुढच्या या सभेमध्ये घ्या. म्हणजे जरी ते विषय अजेंडयावर नसतील तरी ते विषय घ्या.

**मा.महापौर सो., :-**

लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे यांचा ३ जुन रोजी आकस्मिक निधन झाल्यामुळे सभागृह नेते व विरोधी पक्ष नेते यांनी आज सभा तहकुबी मांडलेली आहे. मुंडे साहेबांचा स्वभाव अतिशय दिलदार असा होता. त्यांचा परिचय मला असा आठवतो की, ते ठाण्यामध्ये कधीही आले तरी ठाणे जिल्हयाचे संपर्कप्रमुख मा.एकनाथजी शिंदे साहेब यांचेसोबत कार्यक्रमाला जाण्याची संधी उपलब्ध व्हायची. एक-दोन प्रसंग मी आपल्याला सांगू इच्छितो की, घोडबंदर रोड येथील हावरे प्रोजेक्टमध्ये चावी देण्याच्या कार्यक्रमासाठी ते आले होते आणि त्या ठिकाणी पाण्याची समस्या होती. त्यावेळी आमच्याबरोबर बीजेपीची श्री.पाटणकर वगैरे सर्व मंडळी होती. त्यावेळी मुंडे साहेबांनी मला सांगितले की, महापौर साहेब घोडबंदर येथे पाण्याची खूप समस्या आहे. घोडबंदर हा भाग नविन ठाणे म्हणून विकसित होत आहे, परंतु या भागात पाणी नाही. निदान त्यांना पिण्याचे पाणी तरी उपलब्ध करुन द्या असे त्यांनी मला सांगितले. त्यांनतर आम्ही घोडबंदर भागातील पाण्याची स्कीमबद्दल फॉलो अप करुन आता त्याची टेंडर प्रक्रिया होणार आहे. ही २४ x ७ अशी योजना आपण प्रथमच घोडबंदरला सुरु करत आहोत. त्यांच्या सांगण्यावरुन आपण हे करत आहोत, परंतु दुर्दैवाने आज ते आपल्यामध्ये नाहीत. शपथविधी होण्यापूर्वी त्यांनी मला एक फोन केला होता की, महापौर साहेब कमिशनरकडे काम आहे तर तुम्ही चर्चा करणार का? मी आता दिल्लीला निघालो आहे. त्यावर मी त्यांना म्हटले की, साहेब तुम्ही फक्त आदेश करा की काय काम आहे. आमचे हे बोलणे झाल्यानंतर ते दिल्लीसाठी रवाना झाले आणि ३ जुन रोजी आपण टी.व्ही.मध्ये पाहिले की, मुंडे साहेबांचे अपघाती निधन झाले. सर्वांनाच एकदम शॉक बसला की, असे होऊच कसे शकते? त्यांच्याबरोबर पायलटींग नव्हती. त्यांच्या मतदारसंघात त्या दिवशी त्यांचा सत्कार होता म्हणून ते एअरपोर्टसाठी रवाना होत होते आणि अचानक एका सिग्नलवर त्यांचा अपघात होतो, परंतु विधात्याच्या लिखाणाला कोणीही थांबवू शकणार नाही. त्यांचे आकस्मिक निधन हा आपल्या महाराष्ट्राला एक फार मोठा धक्का आहे. त्यांच्या अंत्यविधीसाठी तेथील संपूर्ण रस्ताच पॅक होता आणि त्यांच्या दहाव्या दिवशीच्या कार्यांना २ लाख लोक जमा होते. माणूस किती जगला हे महत्वाचे नाही तर तो कसा जगला हे महत्वाचे असते. मी तमाम ठाणेकरांच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली देतो आणि संपूर्ण सभागृहाच्या, माझ्या पक्षाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली देतो आणि सर्वांना विनंती करतो की, आपण दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून त्यांना श्रध्दांजली वाहू.

**मा.महापालिका सचिव :-**

पुढची महासभा शुक्रवार २७ जून रोजी सकाळी ११.३० वाजता होईल.

## दुखवटा ठराव

### ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक ९/अ दिनांक १९/०६/२०१४

**ठ रा व :-**

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय नेते व केंद्रीय ग्रामविकास मंत्री, गृहनेते, तसेच लोकनेते म्हणून सर्वपरिचीत श्री.गोपीनाथजी मुंडे हयांचे मंगळवार दिनांक ३ जून २०१४ रोजी सकाळी वयाच्या ६४ व्या वर्षी अपघाती दुर्दैवी निधन झाले. भारतीय जनता पक्ष आणि स्वतः गोपीनाथजी मुंडे हयांच्या कारकिर्दीला उत्तम वळण मिळालेले असतांनाच झालेल्या अपघाताने भारतीय जनता पक्ष आणि संपूर्ण देश एका कर्तृत्ववान नेत्याला मुकला आहे.

कै.गोपीनाथजी मुंडे हयांचा जन्म १२ डिसेंबर १९४९ रोजी एका सामान्य शेतकरी कुटूंबात बीड जिल्हयातील परळी तालुक्यात झाला. सर्वसामान्य शेतकरी कुटूंबात जन्माला आलेल्या कै.गोपीनाथजी मुंडे हयांनी सर्वसामान्यांवर होणा-या अन्यायाला वाचा फोडण्याचा वसा घेतला होता आणि त्यामुळेच तळागाळातील सर्व कार्यकर्त्यांना बरोबर घेत राज्याच्या विकासाला गती देणारे स्व.गोपीनाथजी हे ख-या अर्थाने लोकनेते ठरले.

सन १९६९ मध्ये निकटचे स्नेही कै.प्रमोदजी महाजन हयांच्या सांगण्यावरुन आंबेजोगाई येथील हॉस्टेलमधून मुलांना सोलापूर येथे घेऊन निघालेल्या स्व.गोपीनाथजींच्या राजकीय प्रवासाला देखिल सुरुवात झाली.

१९७५ मध्ये जाहिर झालेल्या आणीबाणीच्या काळात वसंतराव भागवतांनी कै.मुंडे हयांची औरंगाबाद शहर प्रमुख म्हणून त्यांची नियुक्ती केली. दरम्यानच्या काळात निदर्शनांच्या कारणास्तव स्व.गोपीनाथजी मुंडे हयांना कारावास पत्करावा लागला. या दरम्यान कै.प्रमोदजी महाजन हे देखिल तुरुंगात होते त्याच काळात या दोघांमधील मैत्रीचे बंध अधिकच घट्ट झाले. १९७७ मध्ये त्यांची जेलमधून सुटका झाली.

तुरुंगातून सुटका झाल्यानंतर स्व.गोपीनाथजी मुंडे हयांची आपली पहिली विधानसभा निवडणूक लढविली. परंतू त्यात त्यांचा पराभव झाला. मात्र त्यानंतर झालेल्या जिल्हापरिषद निवडणूकीमध्ये उजनी मतदार संघातून विक्रमी मताधिक्याने ते विजयी झाले.

देशात पुलोदचे सरकार आले त्या काळात कै.प्रमोदजी महाजन हयांच्या बरोबरीने त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या प्रचारामध्ये सक्रीय सहभाग घेतला. १९८५ मध्ये भारतीय जनता पार्टीचे ते केंद्रीय सेक्रेटरी त्यानंतर १९८६ मध्ये राज्याचे भाजपा अध्यक्ष असा स्व.गोपीनाथजींचा प्रवास सुरु होता. या दरम्यान आरक्षण, मंडल आयोग, शेतक-यांचे प्रश्न आदी मुद्दयांवर त्यांनी अत्यंत गांभिर्याने सरकारचे लक्ष वेधले होते. १९८७ मध्ये शेतक-यांच्या कर्जमुक्तीसाठी त्यांनी फार मोठे आंदोलन केले. १९९० मध्ये भारतीय जनता पक्षाने शिवसेनेबरोबर युती जाहिर केली. त्यानंतर झालेल्या निवडणूकीमध्ये विरोधी पक्षनेतेपद कै.मुंडे यांच्याकडे आले.

उपमुख्यमंत्री म्हणून पद भुषवितांना कै.गोपीनाथजी मुंडे हयांनी अनेक चांगल्या योजना आणल्या. गरिबांकरिता मोफत घर हे त्यापैकी एक उदाहरण ! गेल्या लोकसभेत पक्षाचे उपनेते म्हणून त्यांनी उत्तम योगदान दिले होते.

राजकारणात मोठे व्हायचे असेल तर आपला शत्रुही तेवढाच मोठा असला पाहिजे हे माहिती असलेल्या कै.मुंडे हयांनी त्याच दृष्टीने सातत्याने आपली राजकीय पावले उचलली. मुंडे हयांना काँग्रेस-राष्ट्रवादीमधील आपल्या विरोधकांशी जेवढा संघर्ष करावा लागला तेवढाच पक्षांतर्गत विरोधकांशी सामना करावा लागला. आपल्याला मिळालेल्या यशापेक्षा सामान्य जनतेमध्ये निर्माण केलेला विश्वास आणि पदाचा योग्य प्रकारे वापर करुन आपल्या मतदार संघाचे प्रश्न प्रभावीपणे मांडणीची किमया कै.गोपीनाथजी मुंडे यांना साधली होती. अशा या लोकनेत्याला केंद्रीय मंत्रीपदाच्या रुपाने पुन्हा एकदा एक नविन संधी ती देखिल भारतीय जनता पक्षाचे सार्वभौम असे सरकार स्थापन झालेले असतांना मिळाली होती. या संधीचा उपयोग करुन ग्रामविकासाच्या माध्यमातून खेडयांकरिता आणि शेतक-यांकरिता योजना आखण्याचा विचार असतांनाच थोडयाच कालावधीमध्ये अगदी शपथविधीनंतर अवघ्या आठच दिवसात काळाने त्यांच्यावर घातलेल्या क्रूर आघाताने त्यांना आपल्यातून हिरावून घेतले.

तळागाळातील माणसाच्या घराघरापर्यंत कै.गोपीनाथजी मुंडे जाऊन पोहोचले होते. आणि म्हणूनच ते लोकनेते म्हणून लोकप्रिय होते. त्यांच्या अंत्यविधीच्या प्रसंगी त्या ठिकाणी हजर राहिलेल्या जनसागराच्या रुपानेच कै.गोपीनाथजी मुंडे हयांची लोकप्रियता सर्व जगाने आपल्या डोळयांनी पाहिली. अभूतपूर्व असा शोकाकूल जनसागर परळी येथे लोटला होता.

कै.गोपीनाथजी मुंडे हयांच्या या आकस्मिक दुर्दैवी निधनाने त्यांचे केवळ कुटूंबियचं नव्हे तर संपूर्ण मराठवाडयासह महाराष्ट्र देखिल पोरका झालेला आहे. कै.मुंडे हयांच्या निधनाने भारतीय जनता पक्षात निर्माण झालेली पोकळी भरुन निघणारी नाही.

कै.गोपीनाथजी मुंडे हयांच्या कुटूंबियांसह सर्व जनतेस व मित्रपरिवारांस झालेल्या दु:खात सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती लाभो अशी इश्वर चरणी प्रार्थना करुन भावपूर्ण श्रध्दांजली अपर्ण करीत आहोत.

**सुचक :- श्री. संतोष वडवले** **अनुमोदक :- श्री. हणमंत जगदाळे**

**सर्वानुमते मंजूर.**

**सही/- श्री.हरिश्चंद्र पाटील**
**महापौर,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**(तद्‌नंतर श्रध्दांजली वाहून दुपारी ठिक १२.३५ वाजता मा. महापौर महोदय, तहकूब करतात. )**

**(अशोक बुरपल्ले)**
**महापालिका सचिव,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**सभा तहकुब झाल्याची वेळ दुपारी. १२.३५ वा.**
**महापालिका सचिव कार्यालय,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**
**दिनांक -१९/०६/२०१४**

**सही/-**
**(हरिश्चंद्र श्रीपत पाटील)**
**महापौर,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**